प्रेसनोट

आर्थिक गुन्हे शाखा, जळगांव
दि.14.05.2026

प्रति,

मा.संपादक
सर्व वृत्तपत्र,दैनिक,साप्ताहीक,मासिक, जळगांव शहर

**विषय:-** गुंतवणुकदारांची फसवणुक करणा-या TWJ असोशिएट्स प्रा.लि. या कंपनीचे संचालक, ब्रँच मॅनेजर, इतर संचालक व एजंट यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केले बाबत..

मिलींद शालिकराव पाटील, रा. जळगाव याने TWJ असो.प्रा.लि.पुणे या कंपनीचे मुख्य संचालक व इतर संचालक यांचे विरुध्द गुंतवणुकदारांची गुंतवणुक स्विकारुन मुदतीत परतावा दिलेला नाही यामुळे तक्रार अर्ज दिलेला होता. नमुद तक्रारी अर्जाची मा. पोलीस अधीक्षक, जळगांव यांचे आदेशाने आर्थिक गुन्हे शाखा जळगांव यांनी सखोल चौकशी केली असता, चौकशीअंती मिलींद शालिकराव पाटील हाच TWJ असोशिएट्स जळगाव या फर्मचे फ्रेंचायसी नात्याने सर्व कामकाज पाहत होता. गुंतवणुकदारांकडुन गुंतवणुका स्विकारुन तसे त्यांना करारनामे करुन देत होता. तसेच त्यास मोठया प्रमाणात कमीशन प्राप्त झालेले आहे, यावरुन अर्जदार मिलींद पाटील याचा सदर गुन्हयात सहभाग निष्पन्न झालेला आहे. एकंदरीत TWJ असोसिएट्स प्रा.लि.चे मुख्य संचालक 1) समीर सुभाष नार्वेकर 2) सौ. नेहा समीर नार्वेकर तसेच TWJ इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्रा.लि. चे संचालक 3) संकेश रामकृष्ण घाग, 4) TWJ असोसिएट्स जळगाव शाखेचे मिलींद शालिकराव पाटील, रा. जळगाव तसेच इतर संचालक व एजंट अशांनी डिसेंबर 2020 ते सप्टेबर 2025 या कालावधीत संगनमत करुन प्रथमत: गुंतवणुकदारांना शेअर मार्केट ट्रेडिंगची माहिती देऊन, त्यांची दिशाभूल करुन, ठिकठिकाणी सेमिनार आयोजीत करुन, TWJ असो. प्रा.लि. कंपनीत गुंतवणुक केल्यास जास्तीत जास्त दरमहा परतावा देण्याचे आमिष दाखवुन, नियमबाह्य स्कीम राबवुन, सेबीच्या नियमांचे उल्लंघन करुन, एकुण 279 गुंतवणुकदारांकडुन 11 महिने मुदतीकरीता एकुण 23,81,72,530/- रुपये गुंतवणुक करुन घेऊन नंतर गुंतवणुकदारांना परतावा न देता, गुंतवणुकदारांचा अन्यायाने विश्वासघात करुन, फौजदारीपात्र न्यासभंग /फसवणुक करुन अपहार केला असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द गुंतवणुकदार श्री भरत रतीलाल पवार रा. पाळधी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जिल्हापेठ पोलीस स्टेशन येथे गु.र. नं.165/2026 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 318(4), 316(2), 316(5), 61(2) सह बेकायदेशीर ठेव योजना प्रतिबंध अधिनियम 2019 (THE BANNING OF UNREGULATED DEPOSIT SCHEMES ACT) चे कलम 21 व 23 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे यांचे आदेशाने आर्थिक गुन्हे शाखा जळगांव यांचेकडे वर्ग करण्यात आला आहे.

सदर गुन्हयात आरोपी नामे मिलींद शालीकराव पाटील वय-41 वर्षे, रा. शिवकॉलनी जळगांव यास अटक करण्यात आली असुन त्यास रिमांडकामी उदईक रोजी मा. न्यायालयात हजर करीत आहोत. तसेच सदर TWJ असो.प्रा.लि. पुणे या कंपनीचे संचालकांवर 1)अवधुतवाडी पोस्टे (यवतमाळ) 2) चिपळुण पोस्टे (रत्नागिरी) 3)खारघर पोस्टे (नवी मुंबई) 4)वारजे माळेवाडी (पुणे शहर) 5)श्रीनगर पोस्टे (ठाणे शहर) 6) धंतोली पोस्टे (नागपुर शहर) 7) माणगांव (रायगड) 8)एम आय डी सी सिडको पोस्टे (छत्रपती संभाजी नगर, शहर) अशा ठिकाणी गुन्हे दाखल असुन श्रीनगर पोलीस ठाणे, ठाणे शहर यांनी त्यांचे गुन्हयात आरोपी समीर सुभाष नार्वेकर व नेहा समीर नार्वेकर यांना दि. 30.01.2026 रोजी अटक करण्यात आलेली असुन सध्या धंतोली पोस्टे (नागपुर शहर) यांनी त्यांचे गुन्हयात ताबा घेतला आहे. सदर आरोपींचा लवकरच ताबा घेवुन त्यांचेकडे तपास करीत आहोत.

Scanned with OKEN Scanner

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे, मा.अपर पोलीस अधीक्षक, संदीप गावित, प्र.पोलीस उप अधिक्षक संदीप पाटील (पो.नि.) आर्थिक गुन्हे शाखा, जळगांव यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि गणेश फड व पोहेकॉ. रविंद्र परदेशी, पोकॉ. विकास पहुरकर असे पथक करीत आहे. तरी TWJ असो.प्रा.लि. जळगांव शाखा येथे गुंतवणुक केलेल्या गुंतवणुकदारांनी आपण गुंतवणुक केलेल्या गुंतवणुकीची माहीती आर्थिक गुन्हे शाखा, जळगांव येथे द्यावी असे आवाहन करण्यात येत आहे.

प्र.पोलीस उप अधीक्षक
आर्थिक गुन्हे शाखा,जळगांव

Scanned with OKEN Scanner